**<u>प्रेसनोट दि. २५/०५/२०१९</u>**

**<u>सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे शहर</u>**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन अंकीत नऱ्हे मार्शल कर्मचारी यांनी सर्तक डयुटी करुन केली उत्कृष्ट कामगिरी**

-----------------------------------------------------------------------------------------------

दि. २४/०५/२०१९ रोजी पो.ना. ३१७१ सुशांत यादव व पो.शि. ७५७५ महेंद्र राऊत, सिंहगडरोड पोलीस ठाणे पुणे यांना नऱ्हे मार्शलवर रात्रपाळी कर्तव्यावर पेट्रोलींग करीत असताना रात्रौ ०२.५० वा. चे सुमारास श्री कंट्रोल चौक नऱ्हे पुणे येथे ॲक्टीव्हा गाडी नं. एम.एच. १२ क्यु.डी. ९९८९ वरील तीन इसम संशयीतरित्या जात असताना दिसले. तेव्हा नऱ्हे मार्शल कर्मचारी पो.ना. ३१७१ सुशांत यादव व पो.शि. ७५७५ महेंद्र राऊत यांनी त्यांना थांबण्याचा इशारा केला असता, ते न थांबता पळुन जावु लागल्याने नऱ्हे मार्शल कर्मचारी पो.ना. ३१७१ सुशांत यादव व पो.शि. ७५७५ महेंद्र राऊत यांनी ॲक्टीव्हा मोटार सायकलवरील तीन इसमांचा पाठलाग करुन त्यांना त्यांचे गाडीसह ताब्यात घेवुन त्यांना त्यांचे नाव पत्ते विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) राजु सखाराम कांबळे, वय २६ वर्षे, धंदा-टेम्पो चालक, रा. ५४ एच.पी. घर नं. ७७७, लोहीया नगर, पुणे २) विक्रांत नससिंग गंधाल, वय २७ वर्षे, धंदा-नोकरी, रा. रा. ५४ एच.पी. घर नं. ८८०, लोहीया नगर, पुणे ३) अक्षय मनोज परदेशी, वय २३ वर्षे, धंदा-हातगाडी व्यवसाय, रा. ४१ घोरपडी पेठ, पुणे असे नाव पत्ते सांगीतले. मार्शल कर्मचारी यांनी त्यांची अंगझडती घेतली असता इसम नामे विक्रांत नरसिंग गंधाल याच्याकडे एक धारदार पात्याचा लोखंडी कोयता मिळुन आला तसेच इसम नामे राजु सखाराम कांबळे याच्याकडे देखील एक धारदार पात्याचा लोखंडी कोयता मिळुन आल्याने नऱ्हे मार्शल कर्मचारी पो.ना. ३१७१ सुशांत यादव व पो.शि. ७५७५ महेंद्र राऊत यांनी रात्रपाळी गस्त अधिकारी पोलीस उप-निरीक्षक एस.बी.जाधव यांना सदर ठिकाणी बोलावुन घेतले असता पोउपनिरी एस.बी.जाधव यांनी यांनी सदरचे दोन्ही लोखंडी कोयते दोन पंचांसमक्ष जप्त केले.

सदरचे इसम नामे १) राजु सखाराम कांबळे, वय २६ वर्षे, धंदा-टेम्पो चालक, रा. ५४ एच.पी. घर नं. ७७७, लोहीया नगर, पुणे २) विक्रांत नससिंग गंधाल, वय २७ वर्षे, धंदा-नोकरी, रा. रा. ५४ एच.पी. घर नं. ८८०, लोहीया नगर, पुणे ३) अक्षय मनोज परदेशी, वय २३ वर्षे, धंदा-हातगाडी व्यवसाय, रा. ४१ घोरपडी पेठ, पुणे यांनी त्यांचेजवळील ॲक्टीव्हा गाडी नं. एम.एच. १२ क्यु.डी. ९९८९ या गाडीवरुन दोन लोखंडी कोयते संशयीतरीत्या बेकायदेशीररीत्या स्वतःचे ताब्यात बाळगल्याने मा. पोलीस सह आयुक्त सो. यांचे आदेशाने पुणे शहरात शस्त्र, लाठया, काठया, वापरण्यास बंदी आदेश असताना त्याचा भंग केला म्हणुन सदर इसमांचे विरुध्द आर्म ॲक्ट कलम ४(२५) तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करुन दाखल गुन्ह्यात मिळुन आलेली ॲक्टीव्हा गाडी नं. एम.एच. १२ क्यु.डी. ९९८९ ही गाडी व दोन धारदार पात्याचे लोखंडी कोयते जप्त करुन पोलीस उप-निरीक्षक एस.बी.जाधव व नऱ्हे मार्शल कर्मचारी पो.ना. ३१७१ सुशांत यादव व पो.शि. ७५७५ महेंद्र राऊत यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.